23-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/22/2025 11:24 PM Page 1



## निवडक



साखळी : श्रीसाई उसपकर याला प्रशस्तिपत्रक देताना मान्यवर.

### गोवा कोड्स स्पर्धेत श्रीसाई उसपकर, अर्पिता सिंग प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २२ :** तांत्रिक शिक्षण संचालनालय पणजी यांच्या कोडिंग अँड रोबोटिक्स इन एज्यूकेशन या योजनेअंतर्गत गोवा कोड्स स्पर्धा घेण्यात आल्या. ही स्पर्धा कोडिंग डिझायनिंग व सर्जनशीलतेचा विकास व्हावा या हेतूने आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत इयत्ता ७ वी गटात प्रथम श्रीसाई उसपकर (डॉ.के.ब.हेडगेवार हायस्कुल कारापूर सांखळी), द्रितीय नियती ताम्हणकर (सेंट जॉन ऑफ द क्रॉस हायस्कुल साखळी), तृतीय मिथिलेश गावस (प्रोग्रेस हायस्कूल साखळी) तर इयत्ता ६ वी गटातील प्रथम पारितोषिक अर्पिता सिंग (सेंट जॉन ऑफ द क्रॉस हायस्कुल साखळी), द्रितीय अश्वथ न्हावेलकर (डॉ. के.ब. हेडगेवार हायस्कुल कारापूर साखळी) तृतीय देव दिवाणी (सेंट जॉन ऑफ द क्रॉस हायस्कुल सांखळी) यांना प्राप्त झाली.

### शिवोली देवी कालिका देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून भरगच्च कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २२ :** शिवोली येथील श्री देवी कालिका देवस्थानचा ६४ वा वर्धापनदिन सोहळा बुधवार दि. २३ एप्रिल ते बुधवार दि. ३० रोजीपर्यंत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार असल्याचे देवस्थान उत्सव समितीने कळविले आहे.

या निमित्त दररोज सकाळी श्रींची विधिपूर्वक पूजा अर्चा, लघुरुद्र, महाभिषेक आरती तीर्थप्रसाद, संध्याकाळी ४ वाजता सिद्धकला भजनी मंडळ ओशेलतर्फे श्री कलावती आईचे भजन व प्रवचन होईल.

यानिमित्त २३ रोजी, रात्री ९.३० वाजता श्रींची बँड वादनासहित पालखीतून मिरवणूक, आरती व तीर्थप्रसाद, रात्री १०.३० वाजता श्री लईराई भक्तगण धोंड व गौरी तनय कला संघ धोंशी नागेशीतर्फे तुळशीदास घोणशीकर लिखित व प्रस्तुत दोन अंकी विनोदी नाटक 'जावय घरान माव दारान' नाटक होईल. या नाटकाचे पुरस्कर्ते शिवलिंग वेर्णेकर, भरत सातार्डेकर व विकेश पेडणेकर आहे. गुरुवार दि. २४ रोजी सकाळी धार्मिक विधी होईल. रात्री ९.३० वाजता श्रींची पालखीतून मिरवणुक, आरती तीर्थप्रसाद रात्री १०.३० वाजता ब्राह्मण बाल हौशी नाट्य मंडळातर्फे लिखित महेश नाईक व उदय ताम्हणकर दिग्दर्शित दोन अंकी कोकणी नाटक 'आत्या आत्या माका सून कर' नाटक होईलय सदर नाटक राजन पेडणेकर व यादवी राजन पेडणेकर यानी पुरस्कृत केले आहे. शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी धार्मिक विधी, रात्री ९.३० वाजता श्रींची पालखीतून मिरवणुक, आरती, तीर्थप्रसाद होईल. रात्री १०.३० वाजता श्री देवी कालिका युवा नाट्य मंडल, ओशेल भाटीतर्फे हरिश ताम्हणकर दिग्दर्शित दोन अंकी विनोदी नाटक 'घरान मांव जाता ते जांव' सादर होईल. शनिवार दि. २६ रोजी सकाळी धार्मिक विधी होईल. रात्री ९.३० वाजता बँड वादन सहित श्रींची पालखी तून मिरवणुक, आरती, तीर्थप्रसाद रात्री १०.३० वाजता श्री देवी कालिका युवक संघ ओशेल भाटी आयोजित कौस्तुभ दिगंबर पेडणेकर निर्मित दोन अंकी कोकणी नाटक 'ना म्हणप ना', या नाटकात मयूर ताम्हणकर, विवेक पेडणेकर, सागर पेडणेकर, संतोष चौगुले, वेदांत, आरंभी पेडणेकर, सिमरन ताम्हणकर यांच्या भूमिका आहेत. सदर नाटकाचे लेखक दीपेश दळवी व मयूर ताम्हणकर यांचे दिग्दर्शन आहे. रविवार दि. २७ रोजी सकाळी धार्मिक विधी होईल. रात्री ९.३० वाजता बँड वादन सहित श्रींची पालखी तून मिरवणुक,आरती तीर्थप्रसाद होईल.रात्री १०.३० वाजता श्री विठ्ठल मंच सांगाती,तिस्क कारापुरतर्फे पुंडलिक नायक लिखित, नितीन नायक दिग्दर्शित दोन अंकी कोकणी सामाजिक धनया देवचारा नाटक होईल. सदर नाटक के. बी. एस. बॉईज ओशेल भाती यांनी पुरस्कृत केले आहे. सोमवार दि. २८ रोजी सकाळी ८ वाजता नवचंडी प्रारंभ, गणेश याग पुजन,अर्चन व नवचंडी पाठ ,आरती तीर्थप्रसाद रात्री ९.३० वाजता श्रींची पालखी तून मिरवणुक,आरती तीर्थप्रसाद रात्री १०.३० वाजता वरदहस्त क्रियेशन केरी सत्तरी निर्मित विशाल गवस प्रस्तुत दोन अंकी विनोदी नाटक 'बायको म्हजी सायको' सादर होईल. सदर नाटक अरुण पेडणेकर,नागेश साळगावकर,शत्रुघ्न हळदणकर,गजानन ताम्हणकर,तुळशीदास पेडणेकर,प्रेमानंद शिरोडकर, चैत्रानंद ताम्हणकर, महेश पेडणेकर,महेश साळगावकर, ज्ञानेश्वर मांद्रेकर, बाबराम उगवेकर, विराज ताम्हणकर, अभिजीत कोचरेकर, विजेंदर सिंग व निलेश कोचरेकर यांनी पुरस्कृत केले आहे. मंगळवार दि. २९ रोजी सकाळी नवचंडी, पूर्णाहुती कार्यक्रम,आरती, महाप्रसाद रात्री ९.३० वा श्रींची बँड वादनसहित पालखीतून मिरवणूक,आरती,तीर्थप्रसाद रात्री १०.३० वाजता अभिनय पणजी प्रस्तुत महेश नायक लिखित व उमेश नायक दिग्दर्शित, धमाल विनोदी नाटक 'आरे देवा, तू रे भावा' सादर होईल. बुधवार दि. ३० रोजी अक्षय तृतीया देवस्थानचा ६४ वा वर्धापनदिन सोहळा. सकाळी विधिवत पुजा, आर्चा ,लघुरुद्र ,महाअभिषेक, सकाळी ११.३० वाजता श्री देव ब्राह्मण देवस्थानात श्रींची बँड वडणासहित पालखीतून मिरवणूक, सुहासिनीतर्फे दीपोत्सव जोडवी कार्यक्रम,महाआरती व त्यानंतर मान्यवरांहस्ते सत्कार सोहळा होणार आहे. श्री विश्वनाथ वामन मोये,मोहनदास रामनाथ चोडणकर व शरद शंकर चोडणकर तदनंतर लकी कूपन ड्रॉ, पावणी, तीर्थप्रसाद महाप्रसाद होईल. संध्याकाळी ४ वाजता श्रींची पालखीतून गावात मिरवणुक, ओट्या भरण्याचा कार्यक्रम होईल. यंदाचा वर्धापनदिन सोहळ्याचे यजमानपद सौ संध्या व किशोर पेडणेकर यांना प्राप्त झाले. पालखी सोबत मुविंग कराओके ऑर्केस्ट्रा व जागराता स्टॉल्स ,पुरस्कर्ते जे बी के स्पोर्ट्स अँड कल्चर क्लब व आयुष मुकेश शिरोडकर, उमेश वायंगणकर, स्वप्नील ताम्हणकर, गुरू उजो कोचरेकर स्मरणार्थ आहेत.तदनंतर,माजी सरपंच रामा श्रीधर परब पुरस्कृत श्री देवी यक्षिणी दशावतार माणगावतर्फे 'अघोरी विद्या' सादर होईल.

### सांतीनेज पणजी येथील वाटारेश्वर संस्थानचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : सांतीनेज पणजी येथील श्री वाटारेश्वर संस्थात मूर्ती प्रतिष्ठापनेचा तृतीय वर्धापनदिन सोहळा गुरुवार दि. २४ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. त्यानिमित्त वाटारेश्वर चरणी चांदीची प्रभावळ अर्पण करण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजता सग्रमहक गणेश याग महारुद्र जप, अभिषेक, सकाळी ८ ते दुपारी महाअनुष्ठान, दुपारी १२.३० वाजता आरती, तीर्थप्रसाद तद्नंतर महाप्रसाद होईल. संध्याकाळी ५ वाजता स्थानिक कलाकारांचे भजन व रात्री ८ वाजता जय हनुमान पारंपरिक दशावतार मंडळ, आरोस–सावंतवाडी यांचे नारायणी नमोस्तुतेदशावतारी नाटक सादर होवून उत्सवाची सांगता होईल.

# लखनौची दमदार सुरुवात

## मार्करामने ५२, मार्शने ४५ धावा केल्या मुकेश कुमारने घेतले ४ विकेट्स

**लखनौ, दि. २२ :**

आयपीएलच्या ४० व्या सामन्यात लखनौ सुपरजायंट्सने दिल्ली कॅपिटल्सला १६० धावांचे लक्ष्य दिले. एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनौने ६ विकेट्स गमावल्यानंतर १५९ धावा केल्या. एडेन मार्करमने ५२, मिचेल मार्शने ४५ आणि आयुष बदोनीने ३६ धावा केल्या. दिल्लीकडून मुकेश कुमारने ४ विकेट्स घेतल्या.

२० व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर लखनौचा कर्णधार ऋषभ पंत बोल्ड झाला. त्याला मुकेश कुमारने बाद केले. यामुळे, लखनौ संघ २० षटकांत ६ गडी गमावल्यानंतर केवळ १५९ धावा करू शकला. २० व्या षटकात लखनौने पाचवी विकेट गमावली. षटकाच्या चौथ्या चेंडूवर मुकेश कुमारने यॉर्कर टाकला. आयुष बदोनी शॉट खेळण्यासाठी ऑफ स्टंपकडे वळतो पण तो बोल्ड होतो.



लखनऊने १४ व्या षटकात तिसरी विकेट गमावली. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मुकेश कुमारने शॉर्ट पिच बॉल टाकला. अब्दुल समदने समोरून शॉट मारला पण मुकेश कुमारने त्याला झेलबाद केले. त्याला फक्त २ धावा करता आल्या. १२ व्या षटकात लखनौने आपली दुसरी विकेट गमावली. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मिचेल स्टार्कने शॉर्ट पिच बॉल टाकला. निकोलस पूरनने पुलसाठी धाव घेतली पण चेंडू त्याच्या बॅटला लागला आणि नंतर स्टंपवर आदळला. पूरनने ९ धावा केल्या.

लखनऊने दहाव्या षटकात पहिली विकेट गमावली. षटकातील शेवटचा चेंडू दुष्मंथ चामीराने चांगल्या लांबीवर टाकला, एडेन मार्करामने कव्हर्सच्या दिशेने शॉट खेळला पण एक्स्ट्रा कव्हर्स पोझिशनवर ट्रिस्टन स्टब्सने त्याला झेलबाद केले. मार्करामने ५२ धावा केल्या. त्याने मिशेल मार्शसोबत ८७ धावांची सलामी भागीदारी केली. एडेन मार्करामने ३० चेंडूत अर्धशतक ठोकले. त्याने मिचेल स्टार्कविरुद्धच्या ९व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर २ धावा घेतल्या आणि त्याचे अर्धशतक पूर्ण केले. लखनौकडून एडेन मार्कराम आणि मिचेल मार्श यांनी पॉवर प्लेमध्ये एकही विकेट पडू दिली नाही. दोघांनीही ६ षटकांत ५१ धावा केल्या.

नाणेफेक गमावल्यानंतर, लखनौ सुपरजायंट्स प्रथम फलंदाजी करायला आले आणि पहिल्याच षटकात ३ धावा काढल्या. संघाकडून एडेन मार्क्रम आणि मिचेल मार्श मैदानावर आहेत. दिल्लीकडून अक्षर पटेलने पहिला षटक टाकला. एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. संघात बदल झाला. मोहित शर्माच्या जागी दुष्मंथ चामीराला संधी मिळाली. तर लखनौ सुपर जायंट्सने त्यांच्या प्लेइंग–११ मध्ये कोणतेही बदल केले नाहीत.

## साई सुदर्शनने इतिहास रचला

**कलकता, दि. २२ :**



२०२५ मध्ये अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये गुजरात टायटन्स (जीटी) आणि राजस्थान रॉयल्स (आरआर) यांच्यातील सामन्यात साई सुदर्शनने इतिहासात आपले नाव कोरले. जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट लीगमध्ये केवळ ३० व्या डावात सुदर्शनने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील

साई सुदर्शनने २०२५ च्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये ५३ चेंडूत ८२ धावांची शानदार खेळी करत आपला शानदार विक्रम कायम ठेवला.गुजरात टायटन्स(जीटी) नरेंद्र मोदी स्टेडियममध्येअहमदाबादकारण यजमान संघाने २१२ धावांचा डोंगर उभा केला.

सुधरसनने अहमदाबादमध्ये सलग पाचव्यांदा ५०+ धावा केल्या आणि या हंगामात पाच सामन्यांमध्ये तिसऱ्यांदा हा टप्पा ओलांडला. डावखुऱ्या फलंदाजाने १५४.७२ च्या स्ट्राईक–रेटने आठ चौकार आणि तीन षटकार मारले. साई सुदर्शन, जो त्याच्या कारकिर्दीतील ३० वी आयपीएल इनिंग खेळत होता, त्याने जगातील सर्वात श्रीमंत लीगमध्ये सर्वात जलद धावा करणारा भारतीय खेळाडू होण्याचा विक्रम आधीच केला आहे आणि लीगमध्ये त्याचा एक निर्दोष विक्रम कायम आहे. सध्या, २३ वर्षीय खेळाडूने ४८.४० च्या सरासरीने १३०७ धावा केल्या आहेत.

सुदर्शन हा इतिहासातील फक्त दुसरा खेळाडू आहे आणि त्यानंतरचा पहिला भारतीय खेळाडू आहेशॉन मार्श३० डावांनंतर १३०० पेक्षा जास्त धावा करणे. किंग्ज इलेव्हन पंजाब (घदखझ) साठी पहिल्या हंगामात ऑरेंज कॅप जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन स्टारने २०१२ च्या मोहिमेतील ३० व्या डावात १३३८ धावा केल्या.

## संत समाज घोटेली केळावडेच्यावतीने समागम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २२ :** परम पूजनीय सद्गुरू माऊलीच्या कृपा आशीर्वादाने संत समाज घोटेली केळावडेच्या नवीन रचनेनुसार सिताराम गावडे (हुळर्णकर) यांच्या ॐ सिद्ध ब्रह्माश्रम केरी घोटेली धनगरवाडा येथील निवासस्थानी संत समागम संपन्न झाले.

सद्गुरू नामघोषाने व दीपप्रज्वलनाने उदघाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून स्थानिक पंचसदस्य संदीप ताटे, ज्येष्ठ प्रचारक चुडामणी हुळर्णकर, तालुका प्रमुख रमाकांत केरकर, संत समाज अध्यक्ष प्रेमानंद गावस उपस्थित होते.

आजच्या काळात संत समागमाची गरज आहे. आपल्या हिंदू धर्माच्या रूढी परंपरा यांना न्याय देण्यासाठी हा संत समागम आहे, असे ज्येष्ठ प्रचारक




चुडामणी हुळर्णकर यांनी सांगितले.

संध्याकाळच्या सत्रात सद्गुरु पुजन व संत समागमाला सुरूवात झाली. धर्मप्रचारक रमाकांत केरकर ,उदगाता गोपाळ गावस,पुरोहित कु.रोवेश शेलार,सौ.रेणुका शेलार या गुरूबंधूनी आपली सेवा सद्गुरूचरणी समर्पित केली. पांडुरंग गावस यांनी गजर घेतला.स्वागत व प्रास्ताविक प्रेमानंद गावस यांनी केले.श्रीराम हुळर्णकर यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांचा वसुंधरा दिनानिमित्त जैवविविधतेचा अभ्यास दौरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २२ :** ऊर्जा स्त्रोतात समावेश झालेल्या डिचोली तालुक्यातील या सरकारी प्राथमिक विद्यालय– पुनर्वसन साळ डिचोली येथे वसुंधरा दिन विशेष उपक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या बौद्धिकतेला पोषक ज्ञानार्जन ठरला.

जैवविविधता अभ्यासदौरा वसुंधरा दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जैवविविधता अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम विवेकानंद पर्यावरण जागृती फौज, वनश्री फाउंडेशन सिंधुदुर्ग आणि लोकमत ऊर्जा यांच्या सहकार्याने राबवण्यात आला.

या अभ्यासदौऱ्यात विद्यार्थ्यांनी निसर्गसंपत्तीचे प्रत्यक्ष निरीक्षण करून त्याची माहिती नोंदवली. त्यांनी विविध झाडांची नावे, पक्षी, प्राणी, कीटक



तसेच त्यांचे औषधी उपयोग यासंबंधी अभ्यास केला.

विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी देववृक्ष म्हणून पूजले जाणारे वड याचे महत्त्व जाणले. कुमयामळ येथील देवराई – म्हणजेच गावातील राखीव व पवित्र जंगल – याचे निरीक्षण करत त्यांनी जैवविविधतेच्या संवर्धनाचे महत्त्व जाणले.तसेच विद्यार्थ्यांनी कुमयामळ येथील देवतळे व देवविहिरींविषयी माहिती मिळवली. या परंपरागत पवित्र स्थळांमुळे स्थानिक पर्यावरण आणि धार्मिक श्रद्धा यांचा परस्परसंबंध समजून घेता आला. विद्यार्थीनी स्वरा पाटील, अस्मी गवस, पालवी नाईक, समर्थ म्हावळणकर, स्वरा देसाई यांचा या डेटा संकलनात समावेश होता. मार्गदर्शक संजय नाटेकर, उपक्रम समन्वयक शिक्षक संकेत नाईक, शिक्षिका स्मिता राऊळ आणि स्थानिक पालक नितीन पिरणकर, नमिता पिरणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासदौरा यशस्वीरित्या पार पडला. विद्यार्थ्यांनी

### निसर्ग संवर्धनाची शाळेतील अनोखी प्रेरणा

अभ्यासादरम्यान गाय बगळा, राखी साळुंकी, सूर्यपक्षी, टिटवी, कोतवाल, कोकिळा, तांबट, शिपाई बुलबुल, दयाळ, कावळा, पांढऱ्या छातीची पाणकोंबडी, शिंपी अशा विविध पक्ष्यांचे निरीक्षण केले. कुंभा, किंकमळ, पळस, काटेसावर, कुडा, किंजळ, मोय, रान भेंडी, वड, गेळा, जलकुबी यांसारख्या वनस्पतींचे पर्यावरणीय महत्त्व जाणून घेतले. सदर उपक्रम प्रभारी मुख्याध्यापक धाकटू पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. विद्यार्थ्यांनी निसर्गाबद्दल जाणीव, कुतूहल आणि संवेदनशीलता असे पर्यावरणीय संस्कार आत्मसात केले असून, ते भविष्यात पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय होतील, असा विश्वास शाळेतर्फे व्यक्त करण्यात आला.

## म्हापशात 'किलबिल संस्कार आणि खेळ यांचा मेळ' शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२ :** गोवा विद्या प्रतिष्ठान संचलित श्री गणेश शिशु वाटिका, गणेशपुरी–म्हापसा येथे 'किलबिल... संस्कार आणि खेळ यांचा मेळ' या नावाने सात दिवसांचे उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आले होते. ७ ते १३ एप्रिल या कालावधीत पार पडलेल्या या शिबिरात विविध उपक्रमांमधून लहानग्यांना आनंददायी आणि शैक्षणिक अनुभव मिळाला.

शिबिरात स्तोत्र, वंदना, योग, चित्रकला, हस्तकला, नृत्य, नाट्य, बोलक्या बाहुल्या, कथा, जलतरण आणि



खेळ यांसारख्या विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. तीन ते सहा वयोगटातील मुलांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

या शिबिराची संकल्पना शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेश भटकुर्से यांची होती. प्रभारी मुख्याध्यापिका सौ. गौतमी गावस यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. श्री गणेश विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षिका तसेच शिशुवाटिकेच्या शिक्षिकांनी मिळून सत्रांचे आयोजन केले.

७ रोजी शिबिराचा उद्घाटन सोहळा झाला. यावेळी व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सीमा कुबल उपस्थित होत्या. समारोप समारंभ १३ रोजी पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेश भटकुर्से, प्राचार्य अनिल सामंत, समितीचे सदस्य जीवन विशाल, दिलीप महाले, प्रशांत बर्वे, पालक–शिक्षक संघाचे अध्यक्ष रविकांत पिळणकर आणि प्रभारी मुख्याध्यापिका गौतमी गावस हे उपस्थित होते.

शिबिराच्या समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांना आणि मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. 'किलबिल...' शिबिराने बालकांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावला, असे प्रतिपादन पालकांनी यावेळी केले. त्याचबरोबर डॉक्टर भटकुर्से यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि प्राचार्य अनिल सामंत यांनी नवीन शैक्षणिक धोरण यावर प्रकाश टाकत, पालकांचे प्रबोधन आणि शिक्षकांना बहुमोल असे मार्गदर्शन केले.

# कोलकाता नाईट रायडर्सचा पराभव

## प्रसिद्ध आणि राशिदला २-२ विकेट, शुभमन आणि सुदर्शनचे अर्धशतक

**कोलकता, दि. २२ :**

उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर, गुजरात टायटन्सने आयपीएलच्या १८व्या हंगामातील सहावा सामना जिंकला. संघाने कोलकाता नाईट रायडर्सचा ३९ धावांनी पराभव केला, यासह टायटन्सने पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थान मिळवले. प्रसीद कृष्णा आणि रशीद खान यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. कर्णधार शुभमन गिलने ९० धावा केल्या.

कोलकाताने ईडन गार्डन्स स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरातने ३ विकेट गमावून १९८ धावा केल्या. साई सुदर्शनने ५२ आणि जोस बटलरने ४१ धावा केल्या. प्रत्युत्तरात, केकेआरला ८ विकेट्सच्या मोबदल्यात फक्त १५९ धावा करता आल्या. कर्णधार अजिंक्य रहाणेने ५० धावा केल्या.

१९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाता २० षटकांत ८ गडी गमावून फक्त १५९ धावाच करू शकला. संघाने सामना ३९ धावांनी गमावला. हर्षित राणासह अंगकृष्ण रघुवंशी २७ धावा करून नाबाद राहिला. २० व्या षटकात ईशांत शर्माने पहिली विकेट घेतली. त्याने षटकातील पहिला चेंडू हळू टाकला. रिंकू सिंग लाँग ऑनवर झेलबाद झाला. त्याने १४ चेंडूत १७ धावा केल्या.

प्रसिद्ध कृष्णाने १७ व्या षटकात २ बळी घेतले. त्याने पहिल्याच चेंडूवर रमनदीप सिंगला झेल देऊन बाद केले. त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर मोईन अली लाँग ऑनवर झेलबाद झाला.

१६ व्या षटकात कोलकाताने पाचवी विकेट गमावली. रशीद खानने षटकातील पाचवा चेंडू चांगल्या लांबीवर टाकला, आंद्रे रसेल मोठा शॉट खेळण्यासाठी पुढे आला पण तो स्टंप झाला. त्याने १५ चेंडूत २१ धावा केल्या.

१३ व्या षटकात अजिंक्य रहाणेने अर्धशतक झळकावले. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर, त्याने वॉशिंग्टन सुंदरविरुद्ध एक धाव घेतली आणि ३४ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. त्याच षटकाच्या चौथ्या चेंडूवर तो मोठा शॉट खेळण्यासाठी पुढे आला पण स्टंपिंग झाले.

कोलकाताने १२ व्या षटकात तिसरी विकेट गमावली. साई किशोरने षटकातील तिसरा चेंडू चांगल्या लांबीने टाकला. व्यंकटेश अय्यरने मोठा शॉट खेळला पण डीप मिड–विकेटवर झेलबाद झाला. अय्यरला १९ चेंडूत फक्त १४ धावा करता आल्या. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात कोलकाताने आपली दुसरी विकेट गमावली. रशीदने षटकातील तिसरा चेंडू गुड लेन्थवर टाकला. सुनील नरेनने शॉट खेळला, पण स्क्वेअर लेग पोझिशनवर झेलबाद झाला. नरेनने १७ धावा केल्या.

१९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, कोलकाता नाईट रायडर्सने रहमानउल्लाह गुरबाज आणि सुनील नारायण यांच्यासह डावाची सुरुवात केली. संघाने पहिल्याच षटकात गुरबाजची विकेट गमावली. त्याला मोहम्मद सिराजने एलबीडब्ल्यू केले. गुरबाजला फक्त १ धाव करता आली. गुजरात टायटन्सने २० षटकांत ३ गडी गमावून १९८ धावा केल्या. संघाकडून जोस बटलर ४१ धावा काढून नाबाद राहिला आणि शाहरुख खान ११ धावा काढून नाबाद राहिला. शुभमन गिलने ९० आणि साई सुदर्शनने ५२ धावा केल्या. कोलकाताकडून वैभव अरोरा, आंद्रे रसेल आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१९ व्या षटकात गुजरातने तिसरी विकेट गमावली. हर्षित राणाने ओव्हरचा तिसरा चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर हळू टाकला. राहुल तेवतियाने शॉट खेळला, पण एक्स्ट्रा कव्हर्स पोझिशनवर तो झेलबाद झाला. त्याला खातेही उघडता आले नाही.



## आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेतल्यास नोकरीची संधी उपलब्ध : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २२ :** दहावी किंवा आठवी पास असलेल्या विद्यार्थ्यांनी आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेतल्यास शंभर टक्के नोकरीची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे इथे प्रवेश घेण्यासाठी कमीपणा समजू नये, असे मुख्यमंत्र्यांनी शालान्त परीक्षा निकालाच्या पार्श्वभूमीवर सांगितले. डिचोली औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला आकस्मिक भेट दिल्यानंतर मुख्यमंत्री पत्रकारांशी बोलत होते.

डिचोली औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील साधन सुविधा जाणून घेण्याच्या हेतूने सोमवारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी अचानक भेट दिली. उच्च कौशल्य विकास साधण्याच्या दृष्टीने इथे असलेल्या साधन सुविधा मध्ये सुधारणा करण्यात येणार, सतरा विविध अभ्यासक्रम या केंद्रात कार्यरत आहेत आणि सुमारे पाचशे पेक्षा जात प्रशिक्षणार्थी या केंद्रात प्रशिक्षण घेत असल्यामुळे इथे असलेली प्रयोगशाळा अपग्रेड करण्यासाठी टाटा टेक्नॉलॉजी बरोबर करार केला असल्याचे तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र वेगवेगळ्या उद्योग कंपनी कडे टायअप केल्याने रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी घरी न राहता जवळच्या आयटीआय मध्ये प्रवेश घ्यावा, असे पुढे सांगितले. इथे उशिरा पर्यंत प्रशिक्षण घेत असलेल्या स्टेनोग्राफीच्या विद्यार्थ्यांबरोबर यावेळी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 230 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .